# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १६१ व्या ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत

## सोमवार, दि. ०४ सप्टेंबर, २०२३ सकाळी ११:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १६१ वी बैठक **सोमवार, दि. ०४ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी ११:०० वा.** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | ऑनलाईन उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे, प्र-कुलगुरु | सदस्य | अनुपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्या | अनुपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ.मलिक सगाजी रोकडे, प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच डॉ. मलिक सगाजी रोकडे, प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे व्यवस्थापन परिषद सदस्यांचे वतीने स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा.(डॉ.) गौतम कांबळे, प्र-कुलगुरु हे काही तांत्रिक कारणास्तव अनुपस्थित होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | **विद्यापीठ परिसरात मॉडेल डिग्री महाविद्यालयासाठी जागा उपलबध करुन देण्याची बाब विचारार्थ**<br><br>टिपणी: मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी पत्र क्र. विससं/उशि/सोविसो/२०२३/१४६४, दि.२५/०८/२०२३ अन्वये प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षण अभियान (पीएम-उषा) अंतर्गत मा. राज्य प्रकल्प संचालक, रुसा यांचेकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात येणार असून सदरचा प्रस्ताव मंजूर झाल्यास व त्याकरीता अनुदान उपलब्ध झाल्यास त्यासाठी ५ ते ८ एकर जागा लागणार आहे. त्यामुळे सदरची जागा उपलब्ध होवू शकेल याबाबतची माहिती सादर करणेबाबत कळविले आहे.<br>सबब, विद्यापीठ परिसरात मॉडेल डिग्री महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ. | **अभियांत्रिकी विभाग** |
| ठराव: | **विद्यापीठ परिसरात मॉडेल डिग्री महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच विद्यापीठ अभियंता यांनी विद्यापीठातील उपलब्ध जागेबाबतची कागदपत्रे शासनास देणेबाबतची कार्यवाही करावी असेही ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **सन २०२३-२४ या वर्षासाठी विद्यार्थी व त्याचे पालक व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासंबंधी पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: विद्यापीठ स्थापनेपासून विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी व त्याचे पालक व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याची कायर्वाही विद्यार्थी विकास विभागाकडून करण्यात येते. सन २०२३-२४ या वर्षात विद्यापीठ व महविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचा विमा उतरविण्यासाठी निवीदा मागविण्याबाबत विद्यार्थी विकास विभागाच्या दि.०३/०५/२०२३ अन्वये मान्यता घेवून कार्यवाहीसाठी प्रस्ताव वित्त व लेखा विभागाच्या (खरेदी व भांडार) विभागाकडे पाठविण्यात आला होता.<br><br>त्यास अनुसरून वित्त व लेखा विभागाकडून विमा ई निविदेची संपुर्ण प्रक्रीया करून संपुर्ण प्रस्ताव विद्यार्थी विकास विभागाकडे पाठविला आहे. प्राप्त झालेल्या तौलनिक तक्ता विचारात घेता L१ आसलेले श्रीराम जनरल इंन्सुरंस कंपनी लि. जयपूर यांचे विद्यार्थ्यांसाठी रू. १४७/- व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी रू.२३६/- इतके दर मान्य करण्यात आले आहेत.<br><br>परंतू सन २०१७-१८ या वर्षात श्रीराम जनरल इंन्सुरंस कंपनी लि. जयपूर यांच्यासोबत प्रस्तूत विद्यापीठाकडून करार करण्यात आला होता. त्या दरम्यान रूपाली केशव पुजारी सिंहगड अभियंत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांचा दि.०२/०८/२०१८ रोजी अपघाती मृत्यू झालेला होता. सदर विद्यार्थ्यीनीस विम्याची रक्कम न मिळाल्याने तिच्या पालकांनी प्रस्तुत विद्यापीठ व श्रीराम जनरल इंन्सुरंस कंपनी लि. जयपूर यांच्या विरुध्द विमा रक्कम वसुल होऊन इतर खर्च मिळण्याकरीता सोलापूर जिल्हा ग्राहक मंच यांच्याकडे तक्रारी अर्ज क्रमांक २१/२ दाखल केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून प्रलंबीत आहे.<br><br>१) सद्यस्थितीमध्ये विद्यापीठ व सर्व संलग्नित महाविद्यालयात प्रवेश प्रक्रीया सुरूवात झाली असून विद्यार्थ्यांचा विमा उतरविण्याच्या अनुषंगाने विमा कंपनीस पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे. | विद्यार्थी विकास विभाग |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२) University Right to Accept Any Bid and to reject any or All Bids at any stage of tender process The University reserves the right to accept or reject any bid, and to annul the bidding process and reject all bids at any time prior to contract award, without thereby incurring any liability to the affected Bidder or bidders असे नमुद कले आहे.

वित्त व लेखा विभागाच्या प्राप्त झालेल्या तौलनिक तक्त्यानुसार L१ व L२ व L३ चा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| Sr. No | Particulars | M/S. Shriram General Insurance Company Limited, Jaipur | | | M/S. TATA AIG GENERAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR | | | M/S. The Oriental Insurance Company Limited, Mumbai | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate | GST | Total | Rate | GST | Total | Rate | GST | Total |
| 1 | Rate per Students including parents during the period | ₹125 | ₹ 22.50 | ₹147.50 | ₹ 135.60 | ₹24.41 | ₹160.01 | ₹284.75 | ₹51.26 | ₹336.01 |
| 2 | Rate per Teacher, Non-Teaching Staff during the period | ₹200 | ₹36 | ₹236 | ₹ 313.56 | ₹56.44 | ₹ 370 | ₹220.35 | ₹39.66 | ₹260.01 |
| | Grand Total | | | ₹383.50 | | | ₹530.01 | | | ₹596.02 |
| | Remark | | | L-1 | | | L-2 | | | L-3 |

उपरोक्त तक्त्यानुसार विद्यार्थी व त्याचे पालक तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे दर अनुक्रमे L1, L2 व L3 चा तपशिल खालील प्रमाणे आहे

| | | | |
|---|---|---|---|
| Rate per Students including parents during the period | ₹147.50 | M/S. Shriram General Insurance Company Limited, Jaipur | L1 |
| | ₹160.01 | M/S. TATA AIG GENERAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR | L2 |
| | ₹336.01 | M/S. The Oriental Insurance Company Limited, Mumbai | L3 |
| Rate per Teacher, Non-Teaching Staff during the period | ₹236 | M/S. Shriram General Insurance Company Limited, Jaipur | L1 |
| | ₹260.01 | M/S. The Oriental Insurance Company Limited, Mumbai | L2 |
| | ₹370 | M/S. TATA AIG GENERAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR | L3 |

सबब, उपरोक्त बाबी विचारात घेता विद्यार्थी व त्याचे पालक व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासंबंधी पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **सखोल चर्चेअंती विद्यार्थी व त्याचे पालक आणि शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी या दोघांसाठी न्युनतम दर असलेले L1 मे. श्रीराम जनरल इन्शुरन्स कंपनी लि., जयपूर यांच्याबाबत न्यायालयीन प्रकरण अद्याप सुरु असल्याने जे फर्म L2 आहेत त्यांना सन २०२३-२४ या वर्षासाठीचा विमा उतरविण्यासंबंधी खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| | | | |
|---|---|---|---|
| **विद्यार्थी व त्याचे पालक** | **₹160.01** | **M/S. TATA AIG GENERAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR.** | **L2** |
| **शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी** | **₹260.01** | **M/S. THE ORIENTAL INSURANCE COMPANAY LIMITED, MUMBAI.** | **L2** |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०३ ]</td><td>सन २०२३-२४ पासून युवा महोत्सवासाठी दुरूस्ती व वाढीव कलाप्रकारासह नियमावली लागु करण्याची बाब विचारार्थ.<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचा युवा महोत्सवाचे आयोजन नेटके व्हावे या दृष्टीने प्रस्तुत विद्यापीठासाठी युवा महोत्सव नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीत काही प्रमाणात त्रुटी असून युवा महोत्सवातील विविध कला प्रकारांच्या बक्षिसांचे मूल्यांकन करताना अडचणीचे ठरत होते. तरी युवा महोत्सव सुरळीत पार पडण्यासाठी युवा महोत्सव नियमावलीत काही दुरुस्त्या करणे आवश्यक आसल्याने मा.कुलगुरू महोदय यांनी नामनिर्देशित कलेल्या समितीची दि.१४ ऑगस्ट तसेच दि.२१ ऑगस्ट, २०२३ अशी दोन वळेस बैठक आयोजित करुन नियमावली दुरूस्ती करून घेण्यात आली आहे. युवा महोत्सव नियमावली दुरूस्ती दरम्यान राज्यस्तरीय युवा महोत्सव इंद्रधनुष्य पश्चिम विभागीय युवा महोत्सव तसेच राष्ट्रीय तरी युवा महोत्सवाची नियमावली संदर्भासाठी वापरण्यात आली होती. राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सव नियमावलीचा अभ्यास करतेवेळी काही कलाप्रकार विद्यापीठ युवा महोत्सवात नसल्यामुळे खालील प्रमाणे कलाप्रकार प्रस्तूत विद्यापीठाच्या युवा महोत्सवात समावेश असावा असे युवा महोत्सव नियमावली दुरुस्ती समितीने सुचविले आहेत.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>कलाप्रकाराचे नाव</th></tr>
<tr><td>१</td><td>मेंहदी (Mehendi) वैयक्तीक</td></tr>
<tr><td>२</td><td>पाश्चिमात्य गायन वैयक्तीक</td></tr>
<tr><td>३</td><td>पाश्चिमात्य वाद्यसंगीत वैयक्तीक</td></tr>
<tr><td>४</td><td>पाश्चिमात्य समूहगान (Westearn Group Song)</td></tr>
</table>
समितीने सुचविल्यानुसार उपरोक्त अक्र १ ते ३ वैयक्तीक व अक्र ४ नुसार सांघिक अशा चार कलाप्रकाराचा युवा महोत्सव नियमावलीत समावेश करण्यास व तसेच सन २०२३-२४ पासून वाढीव कलाप्रकारासह संपुर्ण नियमावली युवा महोत्सवासाठी लागु करण्याची बाब विचारार्थ.</td><td>विद्यार्थी विकास विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>सन २०२३-२४ पासून युवा महोत्सवासाठी वाढीव कलाप्रकार व सुधारित नियमावली लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

मा. प्रभारी कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद